# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## पोलीस उपनिरीक्षक (मुख्य) परीक्षा-२०१६ चा निकाल घोषीत

# घोषणा

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दि. २५ जून, २०१७ रोजी घेण्यात आलेल्या पोलीस उपनिरीक्षक (मुख्य) परीक्षा-२०१६ चा निकाल दिनांक १२ सप्टेंबर, २०१७ रोजी जाहीर करण्यात आला आहे. सदर मुख्य परीक्षेत अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांच्या बैठक क्रमांकाच्या याद्या व प्रस्तुत परीक्षेची गुणांची सीमारेषा उमेदवारांच्या माहितीसाठी आयोगाच्या **www.mpsc.gov.in** या वेबसाईटवरही प्रसिध्द करण्यात आली आहे.

**२. उपरोक्त निकालानुसार शारीरिक चाचणीस पात्र ठरलेल्या सर्व उमेदवारांना त्यांच्या परीक्षेच्या आवेदनपत्रातील दाव्याच्या पृष्ठयर्थ शारीरिक चाचणी व मुलाखतीच्यावेळी त्यांची पात्रता मूळ प्रमाणपत्रावरून तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून शारीरिक चाचणीस बोलविण्यात येत आहे. उमेदवारांनी आवेदनपत्रात दिलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास अथवा आवेदनपत्रातील दाव्यानुसार आवश्यक प्रमाणपत्रांची पूर्तता शारीरिक चाचणीचे/मुलाखतीचेवेळी न केल्यास, अधिसूचनेतील तरतूदीनुसार दावे तपासतांना व अन्य कारणामुळे अपात्र ठरणा-या संबंधित उमेदवारांची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.**

**३. प्रस्तुत निकालाआधारे शारीरिक चाचणीसाठी पात्र ठरलेल्या व अर्जात प्राविण्यप्राप्त (गुणवत्ताधारक) खेळाडूचा दावा केलेल्या उमेदवारांनी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक १ जुलै, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार व त्यास अनुसरुन प्रसिध्द करण्यात आलेल्या दिनांक १८ ऑगस्ट, २०१६ रोजीच्या शुध्दीपत्रकानुसार विषयांकित गट- ब पदासाठी विहित केलेली खेळविषयक अर्हता धारण करीत असल्याबाबतचा संबंधित विभागीय क्रीडा उपसंचालकांचा अहवाल प्राप्त करणे आवश्यक राहील. तद्नुषंगाने संबंधित खेळाडू उमेदवारांनी त्यांच्या क्रीडाविषयक प्रमाणपत्राची विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा संचालनालय यांचेकडून तातडीने पडताळणी करुन घेवून विभागीय क्रीडा उपसंचालकाचा खेळाडू प्रवर्गातील आरक्षित पदासाठी पात्र विषयक अहवाल मुलाखतीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.**

४.. प्रस्तुत पदासाठी शारीरिक चाचणी परीक्षेस पात्र ठरलेल्या उमेदवारांना वैयक्तिकरित्या मोबाईल क्रमांकावर एसएमएसव्दारे कळविण्यात येईल. तसेच त्यांच्या प्रोफाईलवर कळविण्यात येईल. शारिरीक चाचणी व मुलाखतीचा तपशीलवार कार्यक्रम आयोगाच्या संकेतस्थळावर लवकरच प्रसिध्द करण्यात येईल. त्या कार्यक्रमानुसार उमेदवारांनी शारिरीक चाचणीकरीता दिलेल्या तारखेस वेळेवर स्वखर्चाने उपस्थित रहावे.

५. सदर लेखी परीक्षेच्या निकालानुसार अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांचा शारीरिक चाचणीचा कार्यक्रम आयोगाच्या संकेतस्थळावर स्वतंत्ररित्या लवकरच प्रसिध्द करण्यात येईल.

६. प्रस्तुत परीक्षेत अर्हताप्राप्त न ठरलेल्या ज्या उमेदवारांना त्यांच्या गुणपत्रिकेतील गुणांची फेर पडताळणी करावयाची आहे, अशा उमेदवारांनी गुणपत्रके प्रोफाईलमध्ये पाठविण्याच्या दिनांकापासून १० दिवसाच्या आत आयोगाकडे ऑनलाइन पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक राहील. (आयोगाच्या संकेतस्थळावरील सर्वसाधारण सूचनेतील सूचना क्रमांक ३.८ कृपया पहावी)

**विजया पडते**
**उप सचिव (परीक्षा-१)**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

**दिनांक - १२ सप्टेंबर, २०१७**